# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०६.१२.२०२४

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (३०.११.२०२४ ते ०६.१२.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०७.१२.२०२४ ते ११.१२.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | दिनांक | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ६ | ३ | ० | ० | ० |
| २९.८ | २९.५ | ३०.४ | २८.० | २७.५ | २८.० | ३१.० | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | २९ | २९ | २८ | २८ |
| १४.२ | १८.० | १८.५ | २२.४ | २२.० | २१.५ | २१.५ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २२ | १९ | १७ | १६ |
| ० | ० | ८ | ७ | ८ | ७ | ३ | स. ढग स्थिती (आकाश) | ६ | ६ | ५ | ५ | ५ |
| ० | १ | ८ | ७ | ८ | ५ | | दु. | | | | | |
| ७३ | ७६ | ८५ | ९२ | ९२ | ८५ | ७५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ८१ | ८२ | ८१ | ८२ |
| ५६ | ५८ | ६३ | ६५ | ६६ | ६२ | ५२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५६ | ५५ | ५६ | ५६ | ५६ |
| १.४ | १.९ | १.१ | १.८ | ३.४ | १.८ | १.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २ | १ | ० | २ | ७ |
| पू. | पू. | पू. | पू. | पू.ई. | पू. | ई. | स. वाऱ्याची दिशा | ई. | ई. | पू. | उ.ई | ई. |
| पू. | ई. | पू. | ई. | पू. | ई. | पू. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १४८८.३ | ९१ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ७ ते ११ डिसेंबर दरम्यान आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ७ व ८ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.** कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ११ डिसेंबर पर्यंत कमाल तापमान २८.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान १६ ते २३ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८१ ते ८२% तर दुपारची सापेक्ष आद्रता ५५ ते ५६% दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०१ ते ०७ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ८ ते १४ डिसेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे नागरीकांनी पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ वृद्ध लोक आणि लहान मुलांची काळजी घ्यावी<br>➢ जास्तीती जास्त वेळ घरात राहावेप्रवास शक्यतो टाळावा .<br>➢ स्वेटर, मफलर, कानटोपी, पायमोजे हात मोजे घालावेत<br>➢ गरम पेय नियमितपने प्यावे<br>➢ हवामानाच्या अद्यावत महितीसाठी रेडियो ऐकावा, टिव्ही पाहावा तसेच वर्तमान पत्र वाचावे<br>**थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे पिकांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ थंडीपासून पिकाच्या बचावासाठी पिकास सायंकाळी हलके पाणी द्यावे<br>➢ केळीचे गुच्छ सच्छिद्र पॉलिथीन पिशव्याने झाकून ठेवा.<br>➢ उस तोड कामगार यांनी विशेष काळजी घ्यावीथं .डीच्या इशाऱ्या दरम्यान पहाटेच्या वेळी काम करणे शक्यतो टाळावे |
| संदेश | | ➢ ढगाळ हवामानामुळे हरभरा पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. नियंत्रणासाठी पक्ष्यांना बसण्यासाठी दर १५ ते २० मीटर अंतरावर याप्रमाणे प्रती हेक्टरी ५० पक्षी थांबे उभारावेत. |
| मका | शाखीय वाढ | ➢ अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव काही भागात दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी खालील उपाययोजना कराव्यात.<br>➢ **भौतिक उपाय:** प्रादुर्भाव ग्रस्त पिकावरील अंडीपुंज गोळा करून नष्ट करावेत<br>➢ **रासायनिक उपाय:**<br>➢ अळीच्या वाढीच्या लवकरच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पीपीएम ५ मिली किंवा निंबोळी अर्क ५% यांची प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा**<br>➢ क्लोरॅट्रॅनिलीप्रोल १८.५% एस.सी. ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस.जी ८ ग्रॅम प्रती लिटर या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा**<br>➢ स्पिनेटोरम ११.७ एस.सी. या किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा**<br>➢ इमामेक्टीन बेंझोएट ५% +ल्युफेनुरॉन ४०% डब्ल्यू.जी.०.२ ग्रॅम **किंवा** नोव्हालुरॉन ५.२५ % + इमामेक्टीन बेंझोएट ०.९ % एस.सी.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| रब्बी ज्वारी | वाढीची | ➢ किमान तापमान १५ अंश सेल्सिअस पेक्षा कमी झालेले असल्यामुळे वाढीच्या अवस्थेत ज्वारी पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.<br>➢ या किडीची पिल्ले व प्रौढ पानातील अन्नरस शोषण करतात व आपल्या शरीरातून मधासारखा गोड चिकट पदार्थ बाहेर टाकतात त्यावर काळी बुरशी वाढते (चिकटा रोग) त्यामुळे पिकाच्या अन्न तयार होण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो व परिणामी उत्पादनात घट होते.<br>➢ नियंत्रणासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथोएट ५०० मी.लि ५०० लिटर पाण्यातून फवारावे.<br>➢ या किडीच्या नियंत्रणासाठी पिवळया रंगाचे चिकट सापळे एकरी ४ या प्रमाणात लावावे तसेच प्रादुर्भाव दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. |
| गहू | फुटवे फुटण्याची सुरवात | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्याने गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टर याप्रमाणात फवारणी करावी. |
| हरभरा | वाढीची | ➢ हरभरा पिक फुलोरा व घाटे भरण्याच्या अवस्थेत असताना २ % युरिया ची फवारणी करावी |
| काकडी | फुलोरा ते फळधारणा | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे काकडी पिकावर डाउनीमिल्ड्यू (केवडा) या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी अॅझॉक्झीस्ट्रॉबीन १० मिली **किंवा** डायमिथोमार्फ + पायोरॅक्लोस्ट्रोबीन २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| आंबा | नवीन पालवी | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ व आद्रतायुक्त हवामान राहिल्यामुळे नवीन मोहरावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी डोळे फुटताच अॅझॉक्झीस्ट्रॉबीन २३% एस.सी. १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी घ्यावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ तज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहाय्याने निरोगी जनावरांचे लाळया खुरकरत, घटसर्प आणि फऱ्या या रोगांपासून बचावासाठी लसीकरण करून घ्यावे. आजारी तसेच गाभण जनावरांचे लसीकरण करू नये. |
| कुक्कुट पालन | वाढीची | ➢ पुढील ५ दिवस किमान तापमानामध्ये १६.० अंश सेल्सिअस पर्यंत घट होण्याची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घायवी. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०६.१२.२०२४

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर